# नमुना क्रमांक ११

## लेखा परीक्षा अहवाल सहकारी उद्धरण सिंचन (लिफ्ट इरिगेशन) संस्था

### विभाग दुसरा

(१) आर्थिक सहाय्य :—

(अ) शासकीय कर्ज आणि द्रव्यसहाय्य या रूपाने मिळालेले आर्थिक सहाय्य लिहा.

(ब) ज्या कारणासाठी ते दिले आहे त्यासाठी ते योग्य रीतीने वापरले आहे काय ?

(क) शासकीय कर्जाच्या हप्त्यांची योग्य तऱ्हेने परतफेड केली आहे काय ? असल्यास, आजपर्यंत किती रकमेची परतफेड केली आहे ?

(ड) काही हप्ते थकले आहेत काय ? असल्यास, अशी थकलेली रक्कम लिहा.

(२) सिंचाई क्षेत्र आणि योजना :—

(१) सिंचाई योजना— (अ) नदीवर, (ब) तलावावर अगर (क) विहिरीवर यांपैकी कशावर आहे ते लिहून सिंचनाखाली येणारे एकूण क्षेत्र द्या.

(२) सिंचाईचे मंजूर क्षेत्र किती आहे :—

(अ) भारी पिकांसाठी ..

(ब) हलक्या बारमाही पिकांसाठी ..

(क) भुसार पिकांसाठी ..

(ड) तांदुळासाठी ..

(इ) अन्य पिकांसाठी ..

(३) वेगवेगळ्या महत्त्वपूर्ण बाबींवर अंदाजलेला व प्रत्यक्ष झालेला भांडवली खर्च लिहा.

(४) योजनेसाठी पाणीवापर करण्याची परवानगी मिळविण्यात आली आहे काय ? शासनाला देय असलेली स्वामित्वाची रक्कम ठरली आहे काय ?

(५) इमारती आणि दळणवळण खात्याच्या प्राधिकाऱ्याकडून योजनेचे बांधकाम आणि यांत्रिकी भाग पूर्ण झाल्याबद्दल परिपूर्ती प्रमाणपत्रे मिळविली आहेत काय ?

(६) योजना अद्यापही अपूर्ण असेल तर सध्याची प्रगती लिहा.

(७) (अ) योग्य प्राधिकाऱ्यांच्या सहाय्याने सिंचाईखाली येणाऱ्या जमिनीची मोजणी करून घेतली आहे काय ?

(ब) अशा मोजमाप पत्रकावर सभासदांच्या सह्या घेतल्या आहेत काय ?

(शा.म.मु.) स. अ क्यूबी २२५६ (४०,६००—८—८०)

(८) पाणीपट्टीची फोड दरपद्धत वा स्प्लिटरेट पद्धत अस्तित्वात आहे काय ? असल्यास, शासकीय कर्ज, व्याज, झीज आणि ठराविक वरकड खर्च यांच्या स्वरूपात ठरविलेले प्रत्येक हेक्टरचे दर हे किती सभासदांकडून व कोणत्या मर्यादेपर्यंत वसूल व्हावयाचे आहेत ?

(९) इमारती व दळणवळण झाल्यास टक्केवारी खर्च, शासकीय कर्ज आणि द्रव्यसहाय्याच्या रूपात ५०–५० च्या आधारे द्यावयाचे असल्यास लिहा.

(१०) (अ) मंजूर झालेल्या दरानुसार पाणीपट्टी बसवली काय ते लिहा.

(ब) (१) पाणीपुरवठ्यासाठी अर्ज आले आहेत काय ?
(२) व्यवस्थापन समितीने ते मंजूर केले आहेत काय ?

(११) (अ) आकारलेल्या पाणीपट्टीच्या रकमा संबंधित नोंदवहीत घेतल्या आहेत काय ?
(ब) चालू वर्षी आकारलेल्या पाणीपट्टीच्या रकमेचा खालीलप्रमाणे तपशील द्या :—

| अनुक्रमांक | पिकाचे नाव | क्षेत्र | आकारलेल्या पाणीपट्टीची रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

(१२) सभासदांकडून वसूल करावयाच्या पाणीपट्टीच्या रकमा दर्शविणाऱ्या वेगळ्या वैयक्तिक खतावण्या ठेवल्या आहेत काय ?

(१३) (अ) पाणीपट्टीच्या थक-रकमा कोणत्या दिनांकापासून थकल्या आहेत ते आणि बुडित ठरण्याजोग्या रकमा दर्शविणारी थकबाकीदारांची यादी द्या.
(ब) या थक-रकमा वसूल करण्यासाठी पुरेशी कारवाई करण्यात येते काय ?

## (३) यंत्रसामग्री व यंत्रे :—

(अ) संयंत्रे, यंत्रसामग्री, उपकरणे व हत्यारे यांच्या नोंदवह्या व्यवस्थित ठेवल्या आहेत काय ? त्या अद्यावत लिहिलेल्या आहेत काय ?

(ब) इंजिने, विद्युज्जनित्रे, विद्युत मोटार इत्यादींच्या बाबतीतील कार्य (परफॉर्मन्स) नोंदवह्या व्यवस्थित ठेवल्या आहेत काय ?

क) मूलभूत दुरुस्ती (ओव्हर हॉलींग) नियत कालावधी-नंतर करण्यात येते काय ?

## ) योजनेची कार्यवाही :—

(१) उभारलेल्या व उभारावयाच्या कर्जासाठी आपल्या जमिनींचे पुन्हा अभिहस्तांकन (रीअसाईन) करण्याचे प्राधिकार संस्थेला देण्याबाबत सभासदांकडून प्रतिज्ञापत्रे घेतली आहेत काय ?

(२) पाणीवाटप आणि वापर, पाणीपट्टी आकारणी आणि त्यांची वसुली याबाबत नियम तयार केले आहेत काय ?

(३) सिंचाईपात्र क्षेत्रात आपल्या जमिनींचा अंतर्भाव करण्यासाठी आणि संस्थेच्या सोयीनुसार पाण्याचे उप-कालवे खणण्यासाठी सभासदांनी आपली संमतीपत्रे दिली आहेत काय ?

(४) सिंचाईसाठी एकत्रीकरण केलेल्या जमिनी भरपूर उत्पादन आणि काटकसर यांचा लाभ घेण्यासाठी सामूहिकपणे कसल्या जात आहेत काय ?

(५) (अ) पीक घेण्याची पद्धत कृषि अधिकाऱ्याकडून मंजूर करून घेतली आहे काय ?

(ब) अशा पीक घेण्याच्या मंजूर पद्धतीनुसार जमिनीची लागवड करण्यात आली आहे काय ?

(६) संस्थेने चालविलेल्या उत्पादन व्यवसायाच्या संदर्भात पुढील नोंदवह्या तपासा :—

(अ) पीक उत्पन्न नोंदवही किंवा उत्पादन नोंदवही ..

(ब) वैरण नोंदवही ..

(क) दैनिक मजुरी नोंदवही ..

(ड) शिलकी माल नोंदवही ..

(७) चालू वर्षातील विविध प्रकारच्या पिकांचे उत्पन्न आणि त्यांची किंमत दर्शविणारे विवरण द्या.

| पीक वा वैरणीचे नाव | निघालेले एकूण उत्पादन | विकलेल्या मालाची किंमत | न विकलेल्या शिलकी मालाची किंमत, (असल्यास) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

(५) खर्च :—

(अ) व्यवस्थापन समितीने वेळोवेळी खर्च मंजूर केला आहे काय ?

(ब) सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकाच्या मर्यादित खर्च आहे काय ? नसल्यास, पुनर्नियोजनाला (रीॲप्रोप्रिएशन) साधारण सभेने मंजुरी दिली आहे काय ?

**लेखा परीक्षा अधिकाऱ्याची सही व पदनाम.**